कै.श्री.मु.ब.यंदे पुरस्कार

**कल्पना एक आविष्कार अनेक २०१७**

(एकूण वर्ष ३१)

महोदय

स.न.वि.वि.

उपरोक्त संस्थेतर्फे “कल्पना एक आविष्कार अनेक” (वर्ष १४ वे) राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**प्राथमिक फेरी; रविवार ०१ ऑक्टोबर आणि सोमवार ०२ ऑक्टोबर २०१७ सकाळी १०:०० वाजल्यापासून (तालीम स्वरूपात) यशवंत नाट्य मंदिर (रिहर्सल हॉल), माटुंगा रोड, मुंबई, येथे आयोजित करण्यात येईल.** जर अतिरिक्त प्रवेशिका वाढल्या, तर त्यांची प्राथमिक फेरी दोन गटात घेण्यात येईल. या संदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार आयोजकांकडे राहील.

**स्पर्धेची अंतिम फेरी; शनिवार; ०७ ऑक्टोबर २०१७ दुपारी ०३:३० वाजल्यापासून यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा रोड, मुंबई, येथे आयोजित करण्यात येईल.**

**प्रवेश अर्जासोबत रु. ७५०/- (प्रवेश फी); रविवार; २४ सप्टेंबर २०१७ रोजीच, दादर च्या "क्षात्रैक्य समाज" वनमाळी हॉल, पहिला मजला, छबिलदास शाळा समोर, दुपारी ०४:०० ते सायंकाळी ०६:०० पर्यंतच स्वीकारले जातील.**

स्पर्धेचे ड्रॉ त्याच दिवशी सायंकाळी **०६:३० वाजता** काढण्यात येतील. ड्रॉ साठी सदर स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या संस्थेचे प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

सदर स्पर्धेत भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करण्यात आपण निश्चितपणे सहकार्य कराल, असा विश्वास आहेच.

**कल्पना: "कृपा"**



**कल्पना सूचक: ज्येष्ठ साहित्यिक, जागतिक कीर्तीचे नाटककार**

**श्री. महेश एलकुंचवार**

धन्यवाद!

आपला स्नेहाभिलाषी

**"अस्तित्व"**

**संपर्क: आयोजक**

**रवि मिश्रा: +९१९८२१०४४८६२**

**स्पर्धेचे नियम:**

- स्पर्धेची प्राथमिक फेरी; **रविवार ०१ ऑक्टोबर आणि सोमवार ०२ ऑक्टोबर २०१७ सकाळी १०:०० वाजल्यापासून (तालीम स्वरूपात), यशवंत नाट्य मंदिर (रिहर्सल हॉल), माटुंगा रोड, मुंबई, येथे आयोजित करण्यात येईल.**
- स्पर्धेची अंतिम फेरी; **शनिवार; ०७ ऑक्टोबर २०१७ दुपारी ०३:३० वाजल्यापासून यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा रोड, मुंबई, येथे आयोजित करण्यात येईल.**
- प्रवेशअर्ज भरण्याची तारीख **रविवार; २४ सप्टेंबर २०१७** असून; प्रवेश अर्जासोबत **रु.७५०/-.** प्रवेश आकार आयोजक संस्थेकडे **रविवार; २४ सप्टेंबर २०१७** रोजी भरणे आवश्यक आहे. प्रवेश आकार कोणत्याही कारणास्तव परत दिला जाणार नाही.
- एकांकिका / संहिते ला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळाले असले पाहिजे. सदर प्रमाणपत्राची एक प्रत, एकांकिकेच्या दोन प्रती, लेखकाच्या परवानगीचे मूळपत्र अर्जासोबत देणे आवश्यक आहे.
- सादर करण्याची तारीख, क्रम व वेळ ड्रॉ पद्धतीने ठरविण्यात येईल. प्रवेश पत्रिका अपूर्ण असल्यास तिचा विचार केला जाणार नाही.
- स्पर्धा समिति ठरवेल त्या दिवशी, वेळी आणि क्रमानुसार, स्पर्धक संस्थेला आपला नाट्यप्रयोग विनातक्रार सादर करावा लागेल.
- एकांकिकेचा कालावधी किमान **३५** मिनिटे व कमाल **४०** मिनिटे असणे बंधनकारक राहिल. आधीच्या एकांकिकेचे नेपथ्य काढून प्रकाशयोजनेसाठी कमाल **२०** मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.या नियमाचे पालन करण्यासाठी विशेषत: नेपथ्यकार व प्रकाशयोजनाकार यांनी विचार करावा अशी अपेक्षा आहे.
- सादर झालेल्या एकांकिकेचा यापूर्वी प्रयोग झाला होता अशी तक्रार आल्यास व चौकशी अंती असे आढळून आल्यास परीक्षकांच्या निर्णयानुसार कारवाई केली जाईल.
- स्पर्धेच्या वेळेचे बंधन पाळणे प्रत्येक स्पर्धक संस्थेस बंधनकारक राहिल. स्पर्धक संस्थेने नियोजित सादरीकरणाच्या वेळेपूर्वी किमान ०१ तास आदी उपस्थित असणे बंधनकारक राहिल.
- प्राथमिक फेरी तालीम स्वरूपात होईल. अंतिम फेरीसाठी आयोजक संस्थेतर्फे **"विनामूल्य" ०६ स्पॉट** (स्पॉटचे लोकेशन बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही), नेपथ्यासाठी **०६ ठोकळे, ०६ प्लॅटफॉर्म,** एकांकिकेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे.
- सर्वसाधारण रंगभूषेसाठी (अंतिम फेरी) आयोजन संस्थेतर्फे मेकअप व्यवस्था करण्यात येईल. विशेष रंगभूषेची आवश्यकता असल्यास त्याचा खर्च स्पर्धक संस्थेला करावा लागेल.
- स्पर्धेचे आयोजन मुंबई विभाग फेरीसाठी मुंबईतच केले जाईल. मुंबई बाहेरील संस्था या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील परंतु मुंबई बाहेरीलच्या कोणत्याही संस्थेला प्रवासखर्च देण्यात येणार नाही.
- कोणताही स्पर्धक (दिग्दर्शक / अभिनेता / अभिनेत्री / तंत्रज्ञ) कलावंतास एकाच एकांकिकेसाठी स्पर्धेत सहभागी होण्याची अनुमती राहिल.
- एकांकिका स्पर्धेचे परीक्षक नेमण्याचा अधिकार आयोजक संस्थेस असेल. परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम असेल व तो सर्व स्पर्धक संस्थास बंधनकारक राहील.
- स्पर्धक संस्थांचे प्रतिनिधी व आयोजक संस्था यांची सभा **रविवार; २४ सप्टेंबर २०१७ रोजीच, सायंकाळी ०६:३० वाजता, दादर च्या "क्षात्रैक्य समाज" वनमाळी हॉल, पहिला मजला, छबिलदास शाळा समोर,** येथे होईल. **या सभेत सादरी करणाच्या तारीख, वेळ, क्रम ठरवण्यात येईल.**
- एकांकिकेची संहिता पूर्णपणे नवीन असून या पूर्वी सदर संहितेचा / एकांकिकेचा कोठेही प्रयोग झालेला नसल्याचे लेखकाचे प्रमाणपत्र संहिते बरोबर देणे गरजेचे आहे.
- एकांकिका कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेली असावी. **रविवार; २४ सप्टेंबर २०१७** रोजी संहितेच्या दोन प्रती आयोजकांकडे सादर करणे आवश्यक राहील. एकांकिकेच्या प्रती सादर करतांना सदर एकांकिका सेन्सॉर बोर्ड ऑफिसमध्ये प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सादर केल्याबद्दल प्राप्त रिसिटची छायाप्रत सादर करावी.
- एकांकिकेत / साहिंतेत विषय सूचक, आयोजक, अथवा कोणत्याही व्यक्तीचा, सामाजिक अथवा राजकिय संस्थेचा उलेख कटाक्षाने टाळण्यात यावा.
- **कार्यक्रमात व नियमात फेरफार करण्याचा अधिकार स्पर्धा समितीकडे राहील. या संबंधी कोणतीही कारणे देण्यात येणार नाही.**

# प्रवेश अर्ज

- संस्थेचे / महाविध्यालयेचे नाव : ______________________________
- एकांकिकेचे नाव : ______________________________
- लेखकाचे नाव : ______________________________
- दिग्दर्शकाचे नाव : ______________________________
- संस्था प्रतिनिधीचे नाव : ______________________________
- दूरध्वनी/ मोबाइल क्रमांक : ______________________________
- ई मेल : ______________________________
- डी.आर.एम. क्रमांक : ______________________________

प्राचार्य / संस्था अध्यक्ष
सही व शिक्का

आयोजक
अस्तित्व

| | |
|---|---|
| • प्रवेश अर्ज | |
| • संहितेची ०२ प्रती | |
| • सेन्सॉर बोर्ड ची प्रत | |
| • प्रवेश फी | |
| • लेखकाची परवानगी | |